महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २२७ वे | दिनांक : १२/०८/२०२६ | वार : बुधवार

## 'एकाचे हक्क हिरावून दुसऱ्याला देणार नाही'; आरक्षणावर फडणवीसांची स्पष्ट भूमिका



**पुणे :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाच्या आणि विविध समाजांच्या मागण्यांवरून सरकारची भूमिका स्पष्ट करताना, 'राज्य सरकार कोणाच्याही दबावाने किंवा नियमबाह्य पद्धतीने चालणार नाही, तर ते केवळ संविधानानुसारच चालेल,' असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. मराठा समाजासाठी विद्यमान सरकारने केलेल्या ऐतिहासिक कामांचा दाखला देत, मराठा, ओबीसी, एससी आणि एसटी अशा सर्वच समाजघटकांना समान न्याय देण्याची सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच, 'एकाचे हक्क ओरबाडून दुसऱ्याला दिले जाणार नाहीत,' अशी ग्वाही देत सर्वसामान्यांच्या हिताचे आणि संविधानाच्या चौकटीत बसणारेच निर्णय सरकार घेईल, असे फडणवीस यांनी या स्पष्ट केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी स्पष्टपणे आपल्याला सांगतो, सरकार संविधानाप्रमाणे चालतं आणि यापुढेही सरकार संविधानाप्रमाणे चालेल. सरकार दबावाने चालत नाही आणि नियमबाह्य चालत नाही. मात्र सरकार सगळ्यांचं ऐकून घेतं. सगळ्यांचं ऐकून घेणं ही सरकारची जबाबदारी असते. कोणी चांगल्या शब्दात मांडतं, कोणी वेगळ्या शब्दात मांडतं. कुठल्याही शब्दात कोणीही मांडलं, पण जर जनहिताचं असेल तर ते ऐकलं जाईल. संविधानात बसणारं असेल तर ऐकलं जाईल, संविधानात बसणारं नसेल तर ऐकलं जाणार नाही.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमचं लक्ष समाजाकडे आहे आणि मराठा समाजाकरता आमच्या सरकारने जे केलं ते इतर कुठल्याही सरकारने केलं नाही. आम्हाला मराठा समाज असो, ओबीसी समाज असो, एससी असो, एसटी असो, व्हीजे असो, एनटी असो... संविधानाने सगळ्यांची काळजी घ्यायला सांगितलेली आहे. हे सरकार सगळ्यांची काळजी घेईल, सगळ्यांना न्याय देईल. एकाचं ओरबाडून दुसऱ्याला, दुसऱ्याचं ओरबाडून याला, असं हे सरकार करणार नाही. सगळ्यांची काळजी आम्ही घेऊ, आजपर्यंत घेतलीच आहे आणि पुढेही आम्ही घेणार.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर मनोज जरांगे यांनी आरोप केले होते. यावर उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला असं वाटतं की, पहिल्यांदा तर कुठल्याही मंत्र्याकडे कोणाचीही तक्रार आली, तर मंत्र्यावर संविधानाने टाकलेली जबाबदारी आहे की, त्याची चौकशी करायला ती पाठवली पाहिजे. त्याप्रमाणे आलेलं प्रत्येक निवेदन हे त्या-त्या विभागाला पाठवलं जातं. अशाच पद्धतीचं आलेलं निवेदन हे विभागाला गेलेलं आहे. त्या निवेदनामुळे विभाग कुठला निर्णय करत नाही, विभाग पुराव्यांच्या आधारावर करतो. त्या ठिकाणी जी कमिटी आहे, ही कमिटी सरकारला बांधील नाही, ती सरकारला रिपोर्ट देखील करत नाही. त्यांना पूर्णपणे न्यायालयाचा अधिकार आहे. त्या अधिकारात त्यांनी घेतलेला निर्णय... त्या निर्णयापासून कोणी जर दु:खी झालं असेल, तर मागच्याच महिन्यात आपलं जे सेशन झालं, त्या अधिवेशनामध्ये आपण अपिलेट अथॉरिटी तयार केलेली आहे. ते अपिलेट अथॉरिटीकडे जाऊ शकतात.

तसेच पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पण केवळ एखादा मंत्री ओबीसी आहे म्हणून त्याला अशा पद्धतीने टार्गेट करणं हे योग्य नाही. हे महाराष्ट्राला शोभणारं नाही, हे कोणालाही आवडणार नाही. माझं तरी मत आहे की, बावनकुळेंनी कुठलही इंटेन्शनल या ठिकाणी 'याचं रद्द करा, याला द्या' असं केलेलं नाही. मंत्री म्हणून जे कर्तव्य होतं, ते केलेलं आहे. त्याच्या पलीकडे त्यांनी काही केलं नाही. त्यामुळे मला असं वाटतं की, अशा पद्धतीने त्यांना कॉर्नर करणं हे काही योग्य नाही.

दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या भाषणावर तसेच गुंगी गुडिया म्हणत कॉंग्रेसने टीका केली होती. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, तुम्ही कदाचित वहिनींचं पहिल्यांदा इंग्रजीत भाषण ऐकलं असेल, मी याच्यापूर्वी सहा-सात वेळा ऐकलं आणि प्रत्येक वेळी वहिनी कॉन्फिडेंटलीच बोलतात. मला असं वाटतं की, काही लोक डोळ्याला पट्टी बांधून बसले असल्यामुळे आणि त्यांचे विचारच इतके बुरसटलेले असल्यामुळे त्यांना असं वाटतं की एखादी महिला ही राजकारणामध्ये यशस्वी होऊ शकत नाही, एखादी महिला एखादं पद सांभाळू शकत नाही. अशा बुरसटलेल्या विचारांनी ग्रसित लोकांनी ते स्टेटमेंट दिलं होतं, पण स्वर्गीय अजित दादाच्या नंतर वहिनींनी ज्या प्रकारे उपमुख्यमंत्री पद सांभाळलेलं आहे, तेच त्यांना उत्तर आहे, असे फडणवीस यांनी म्हटले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## 'तलवार असून डास मारता'; मुंबई उच्च न्यायालयाची FDA ला फटकार

**मुंबई :** 'तुमच्याकडे अधिकाररूपी तलवार आहे, पण तुम्ही त्याचा वापर केवळ डास मारण्यासाठी करता. हीच खरी समस्या आहे,' अशा अत्यंत कडक शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने अन्न व औषध प्रशासनाची कानउघाडणी केली आहे. कॅडिला फार्मास्युटिकल्स या नामांकित औषध कंपनीवर एफडीएने केलेल्या अचानक जप्ती आणि विक्री बंदीच्या कारवाईवरून उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून, एफडीए केवळ आपल्या अधिकारांचे प्रदर्शन करत असल्याचे खडेबोल सुनावले आहेत.

या प्रकरणी सुनावणीदरम्यान न्यायालयाच्या या आक्रमक पवित्र्यानंतर आणि फटकारण्यानंतर, एफडीएने कॅडिला फार्मास्युटिकल्स कंपनीवरील औषध विक्री व वितरणाची घातलेली बंदी मागे घेण्याची ग्वाही उच्च न्यायालयात दिली आहे. यामुळे कंपनीला मोठा दिलासा मिळाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी पार पडली. यावेळी एफडीएच्या कारवाईवर ताशेरे ओढताना खंडपीठाने अत्यंत महत्त्वपूर्ण टिप्पणी करत सुनावले की, 'आधी गोळी झाडायची आणि नंतर प्रश्न विचारायचे, हा 'वाईल्ड वेस्ट'चा नियम असू शकतो. कायद्याच्या क्षेत्रात किंवा प्रशासनात हा नियम लागू होत नाही. हॉटेल्सवरील धाडीच्या बाबतीतही तुम्ही आधी कारवाई करता आणि नंतर प्रश्न विचारता. निदान सर्व कीटक मारण्याचे काम तरी आधी करा.' तसेच, प्राधिकरणाने आपल्या अधिकारांचा वापर करताना नेहमी विवेकबुद्धी आणि योग्य कायदेशीर पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले.

एफडीएने कॅडिला फार्मास्युटिकल्सच्या काही औषधांचा साठा अचानक जप्त करून त्यांच्या विक्री व वितरणावर थेट बंदी घातली होती, ज्याविरोधात कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेतली. या कारवाईचे समर्थन करताना एफडीएने दावा केला की, कंपनीच्या काही औषधांचे ब्रँडिंग समान असले, तरी त्यातील औषधी घटक (Active Pharmaceutical Ingredient - API) वेगवेगळे आहेत. यामुळे औषध देताना किंवा प्रत्यक्ष वापरताना मोठा गोंधळ होऊन रुग्णांचा जीव धोक्यात येण्याची दाट शक्यता होती.

दुसरीकडे, एफडीएच्या या दाव्यावर कंपनीने आपली बाजू भक्कमपणे मांडली. कोणतीही पूर्वकल्पना किंवा नोटीस न देता थेट औषधांचा साठा जप्त केल्यामुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे न्यायालयात सांगण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने या संपूर्ण प्रकरणावर चिंता व्यक्त केली. तसेच, एफडीएच्या या अचानक केलेल्या कारवाईमुळे बाजारात तब्बल 32 दिवस रुग्णांना संबंधित औषधे उपलब्ध न झाल्याबद्दल न्यायालयाने प्रशासनावर तीव्र ताशेरे ओढले.

उच्च न्यायालयाच्या कठोर पवित्र्यानंतर अखेर एफडीएने नमती भूमिका घेत न्यायालयात आपले स्पष्टीकरण दिले आहे. यानुसार, कॅडिला कंपनीच्या औषध विक्रीवर घालण्यात आलेली बंदी तातडीने मागे घेतली जाईल, अशी ग्वाही प्रशासनाने दिली. तसेच, थेट कारवाई करण्याऐवजी आता नियमानुसार कंपनीला आधी 'कारणे दाखवा नोटीस' बजावण्यात येईल. यावर कंपनीला त्यांचे सविस्तर लेखी उत्तर मांडण्याची पूर्ण संधी दिली जाईल आणि या प्रक्रियेनंतरच कायद्याच्या चौकटीत राहून पुढील योग्य तो आदेश काढला जाईल, असे एफडीएने स्पष्ट केले.

या कारवाईच्या निमित्ताने वारंवार अशा प्रकारच्या याचिका न्यायालयात दाखल होण्यावरही खंडपीठाने तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. यावर भाष्य करताना न्यायालयाने अत्यंत स्पष्ट शब्दांत टिप्पणी केली की, "आम्ही ही याचिका नक्कीच मंजूर करू शकतो; मात्र या संपूर्ण प्रकरणावरून एफडीए आणि त्यांच्या अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या आदेशांचे तसेच कायद्याच्या गांभीर्याचे अजिबात भान नसल्याचेच प्रकर्षाने दिसून येते."

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६


# नाटक हा समाजाचा आरसा - डॉ. गणेश चंदनशिवे




**नाशिक (प्रतिनिधी) :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील माजी विद्यार्थी संघ व ललित कला केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थी मेळावा व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. महाराष्ट्राच्या विविध भागातील ७० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. विद्यापीठातील यश इन सभागृहात झालेल्या या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध लोककलावंत व मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे हे उपस्थित होते. मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, ललित कला केंद्राचे संचालक सचिन शिंदे, प्रा. दत्ता पाटील, विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलतांना प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे म्हणाले, नाटक हा नेहमीच समाजाचा आरसा राहिलेला आहे. समाजातील बऱ्या-वाईट घटना, घडामोडी यावर कधी नर्मविनोदी, कधी मार्मिक तर कधी परखडपणे तत्कालीन नाटकातून भाष्य करण्यात आलेले आहे. सामाजिक स्थित्यंतरे होत गेली तशी नाटकाने आपली कूस बदलली. मात्र, जेव्हा जेव्हा भारतीय नाट्य रंगभूमीला मरगळ आली. तेव्हा भारतीय लोककलेने, लोकरंगभूमीने त्यास तारले, सावरले आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतदेखील लोककला व नाट्यरंगभूमीने आपले योगदान दिले असल्याचे प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे यांनी सोदाहरण सांगितले.चौकट —प्रत्येकाच्या अंगी कलागुण - कुलगुरू प्रा. संजीव सोनवणेआपल्या अध्यक्षीय भाषणात बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की प्रत्येकाच्या अंगी कलागुण, कौशल्य असते. त्यास संधी प्रशिक्षण व पोषक वातावरण देण्याचे काम मुक्त विद्यापीठ करत आले आहे. विद्यार्थ्यांना केवळ प्रमाणपत्रे देणे हे विद्यापीठातील एखाद्या विभागाचे किंवा विद्याशाखेचे काम असू नये या विचाराने विद्यापीठाने स्वत:ची नाट्यनिर्मिती केली आहे, विद्यार्थी व समाज हिताचे अनेक उपक्रम राबवले विद्यापीठामार्फत राबवले जात आहेत. उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांची व उपक्रमांची माहिती इतरांना देवून त्यांना विद्यापीठाशी जोडावे असे आवाहन मा. कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस केले. आगामी काळात विद्यापीठ ललित कला केंद्राच्या माध्यमातून व विद्यार्थ्यांच्या सहभागातून नवीन कलाकृती विद्यापीठ विभागनिहाय सादर करण्याचे निश्चित करण्यात आले.चौकट-माझं विद्यापीठ, माझा अभिमान' उपक्रम राज्यभर राबविणार - डॉ. संतोष साबळेप्रास्ताविकात बोलताना माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. नाट्यशास्त्र म्हणजे केवळ अभिनय, संवाद किंवा रंगमंचावर उभे राहणे नव्हे; तर माणसाला, समाजाला आणि जीवनाला समजून घेण्याची कला असल्याचे सांगून 'माझं विद्यापीठ, माझा अभिमान' हा उपक्रम राज्यभर राबविणार असल्याचे सांगितले. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत एका माजी विद्यार्थ्यांने किमान १० नवीन विद्यार्थी नव्याने विद्यापीठाशी जोडावेत अशी अपेक्षा डॉ. साबळे यांनी शेवटी व्यक्त केली.श्रीमती वीणा शिखरे, सुनील कुलकर्णी, श्रीमती वीणा यादव, वैभव बोराडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यानिमित्ताने झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात 'नाटक: संहिता ते सादरीकरण', 'महाभारत -अंतर्मनाचा स्वर' हे नाट्यअभिवाचन आणि 'द्रौपदीचे मनोगत' ही छोटी नाट्यअभिनयकृती सादर करण्यात आली. सूत्रसंचालन माजी विद्यार्थिनी सई मोने यांनी केले. सचिन शिंदे यांनी आभार मानले.

# 'किस्मत बेग' नाटकाचे यशस्वी सादरीकरण'




**वाळूज :** जि. प. प्रशाला, वाळूज (उर्दू माध्यम) येथे इयत्ता ९वीच्या उर्दू पाठ्यपुस्तकातील 'किस्मत बेग' या ऐतिहासिक नाटकाचे प्रभावी सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. नाटकातून शेवटचे मुघल सम्राट बहादुरशाह जफर यांच्या काळातील ऐतिहासिक प्रसंग, तत्कालीन परिस्थिती आणि विविध व्यक्तिरेखांचे प्रभावी चित्रण करण्यात आले.नाटकामध्ये रुहीना हाशम यांनी तैमूर राजकुमार व किस्मत बेगची भूमिका, पठाण अल्विरा नूर खान यांनी बेगम झीनत महल, सय्यद मसीरा मोईन यांनी मुगल निरीक्षक फरीद खान, पटेल सादिया सुलतान यांनी महाराज, तर सय्यद तस्कीन जावेद यांनी ब्रिटिशांची सेवा करणाऱ्या भारतीय लष्करी अधिकाऱ्याची भूमिका साकारली.शाळा प्रभारी खान गझाला परवीन यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. वर्गशिक्षिका सय्यद बुशरा नाहिद यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. वरिष्ठ शिक्षक सिद्दीकी आमेर जमाल यांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट अभिनयाचे कौतुक केले. मुख्याध्यापक, प्राथमिक विभागातील शिक्षक व संपूर्ण शालेय कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.या नाट्यप्रयोगातून विद्यार्थ्यांना इतिहासाची ओळख, अभिनयकौशल्य, आत्मविश्वास आणि सांघिक कार्याची प्रेरणा मिळाली.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.



**प्रवेश सुरू**

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६


## मैत्री

मैत्रीत असावा
निस्वार्थ भाव
नसावा त्यात कधी
रंक आणि राव

संकटात मिळावा
हात मदतीचा
निरंतर जपावा
धागा विश्वासाचा

मैत्रीचं नातं
अतूट असावं
वेळप्रसंगी
एकदुसऱ्यावर रूसावं

रक्ताच्या नात्यापलीकडची
मैत्री सदा असावी
हळव्या मनात
कटूता कधी नसावी

निरागस मैत्री
जपावी जीवापाड
धर्म आणि जात
ना यावी आड




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


## एकतेची वज्रमुठ

वाचा फोडा अन्यायाला,
जागे राहून सतत.
तेव्हा मिळेल सर्वांना,
कायद्याचे रे मदत. १

हाती घेऊन मशाल,
लावा बुडाखाली आग.
तेव्हा कुठे जनतेला,
येई झोपेतून जाग. २

करू नका कोणी आता,
जुल्म अन्याय सहन.
तुम्हा सर्वांना सांगतो,
गोष्ट यशाची गहन. ३

बांधा एकत्र येऊन,
एकतेची वज्रमुठ
करणार नाही कोणी,
अत्याचार उटसुट. ४

घ्यावे सर्वांनी जाणून,
एकतेत आहे बळ.
पाहताच एकतेला,
शत्रु पोटी उठे कळ. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


# रासायनिक खतांचे जीवमात्रावर होणारे दूरगामी परिणाम

**चिंतन :** ही भारतीय संस्कृतीची जीवनवाहिनी आहे. माती, पाणी, बी-बियाणे, पशुधन आणि शेतकरी यांच्या परस्पर सहजीवनातून अन्ननिर्मितीची प्रक्रिया हजारो वर्षे सुरू आहे. मात्र आधुनिक शेतीमध्ये उत्पादन वाढविण्याच्या स्पर्धेत रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा वाढता वापर झाला. सुरुवातीला त्याचे परिणाम उत्पादनवाढीच्या रूपाने दिसले; परंतु आज त्याची किंमत माती, पाणी, जैवविविधता, प्राणी आणि मानवी आरोग्याला मोजावी लागत आहे.रासायनिक खत म्हणजे केवळ पिकाला दिलेले पोषण नाही. त्याचा अतिरेकी आणि असंतुलित वापर हा संपूर्ण पर्यावरणीय साखळीवर परिणाम करणारा घटक ठरू शकत आहे.मातीचा जीव हरवत चालला आहेमाती ही निर्जीव धूळ नसून असंख्य सूक्ष्मजीव, गांडुळे, बुरशी आणि इतर जीवांनी बनलेली एक जिवंत परिसंस्था आहे. सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मजीव आणि नैसर्गिक पोषणचक्र यामुळे माती सुपीक राहते.रासायनिक खतांचा सतत आणि गरजेपेक्षा जास्त वापर केल्यास मातीतील नैसर्गिक संतुलन बिघडू शकते. सेंद्रिय पदार्थ कमी होणे, मातीची रचना खराब होणे, आम्लता किंवा क्षारता वाढणे आणि सूक्ष्मजीवांच्या विविधतेवर परिणाम होणे अशी समस्या निर्माण होऊ शकते.आज प्रश्न फक्त “एकरी किती उत्पादन मिळाले?” हा नसून “पुढील पिढीसाठी आपली माती किती जिवंत ठेवली?” हा असला पाहिजे.पाण्याचे प्रदूषणशेतात दिलेले खत पूर्णपणे पिकाद्वारे शोषले जात नाही. नायट्रोजन आणि फॉस्फरससारखी पोषकद्रव्ये पावसाच्या पाण्यासोबत वाहून गेली किंवा जमिनीत झिरपली तर भूजल आणि पृष्ठभागावरील जलस्रोतांवर परिणाम होऊ शकतो.जलस्रोतांमध्ये पोषकद्रव्यांचे प्रमाण वाढल्यास शेवाळाची अतिवाढ, पाण्यातील ऑक्सिजनची कमतरता आणि जलचर परिसंस्थेचे नुकसान होऊ शकते.म्हणून शेतातील अतिरिक्त खत शेवटी नदी, तलाव आणि विहिरीपर्यंत पोहोचते, हे विसरून चालणार नाही.मानवी आरोग्यावर परिणामअन्नसाखळीमध्ये माती आणि पाण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. खतांचा अतिरेकी वापर, दूषित पाणी आणि चुकीच्या कृषी पद्धती यामुळे मानवी आरोग्यावर अप्रत्यक्ष परिणाम होऊ आहे.विशेषतः नायट्रेटचे भूजलातील वाढलेले प्रमाण सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. त्यामुळे खतांचा वापर हा केवळ कृषी उत्पादनाचा प्रश्न नसून अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे.जैवविविधतेवर संकटशेतीच्या शिवारात फक्त पीक नसते. तेथे गांडुळे, मधमाश्या, फुलपाखरे, पक्षी, बेडूक, सूक्ष्मजीव आणि असंख्य जीवांचे अस्तित्व असते.असंतुलित कृषी रसायनांचा वापर या जैवविविधतेवर दबाव निर्माण करू शकतो. परागीभवन करणारे कीटक कमी झाले तर त्याचा परिणाम पिकांच्या उत्पादनावरही होऊ शकतो.निसर्गातील प्रत्येक जीवाचे एक कार्य आहे. एखाद्या एका घटकाचे नुकसान झाले तर त्याची साखळी प्रतिक्रिया संपूर्ण परिसंस्थेवर होऊ शकते.हवामान बदलाशी संबंधनायट्रोजनयुक्त खतांच्या वापरातून नायट्रस ऑक्साइडसारख्या हरितगृह वायूंचे उत्सर्जन होऊ शकते. त्यामुळे कृषी क्षेत्राच्या हवामानावरील परिणामांकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.आज हवामान बदलामुळे पाऊस अनियमित झाला आहे, तापमान वाढत आहे आणि दुष्काळ-पुराचे चक्र अधिक अस्थिर होत आहे. अशा परिस्थितीत शेतीने निसर्गाशी संघर्ष करण्याऐवजी निसर्गासोबत काम करण्याची गरज आहे.उत्पादनवाढ की शाश्वत शेती?रासायनिक खतांचा पूर्णपणे निषेध करणे हा या समस्येचा एकमेव उपाय नाही. पिकाच्या गरजेनुसार, माती परीक्षणाच्या आधारावर आणि योग्य प्रमाणात खतांचा वापर करणे महत्त्वाचे आहे.त्याचबरोबर—शेणखत आणि कंपोस्टचा वापरहिरवळीची खतेजैवखतेपीक फेरपालटमिश्रपीक पद्धतीआच्छादन पद्धतीमाती परीक्षणसेंद्रिय कर्ब वाढविणेस्थानिक जैवविविधतेचे संवर्धनपाण्याचा कार्यक्षम वापरया उपायांचा अवलंब केला पाहिजे.शेतकऱ्याला दोष देऊ नका; पर्याय द्यारासायनिक खतांचा वापर वाढला म्हणून केवळ शेतकऱ्याला दोष देणे योग्य नाही. उत्पादनाचा दबाव, बाजारपेठ, वाढती मजुरी, हवामानातील अनिश्चितता आणि तातडीच्या उत्पन्नाची गरज यामुळे शेतकरी अनेकदा उपलब्ध साधनांचा वापर करतो.म्हणून शेतकऱ्याला दोष देण्यापेक्षा माती वाचवणाऱ्या, खर्च कमी करणाऱ्या आणि उत्पादन टिकवून ठेवणाऱ्या पर्यायी शेती पद्धती उपलब्ध करून देणे ही शासन, कृषी विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.पुढच्या पिढीसाठी प्रश्नआपण आज जमिनीला जे देतो, ते उद्या अन्नाच्या रूपाने आपल्या ताटात परत येते. आपण पाण्यात जे सोडतो, तेच पाणी पुढील पिढी पिणार आहे. आपण मातीतील जीवसृष्टी नष्ट केली तर भविष्यातील शेती कोण करणार?म्हणून शेतीचा विकास म्हणजे केवळ उत्पादन वाढवणे नव्हे; मातीचे आरोग्य, पाण्याची शुद्धता, जैवविविधता आणि मानवी आरोग्य यांचे संरक्षण करणे हाच खरा कृषी विकास आहे.आज गरज आहे ती “जास्त खत जास्त उत्पादन” या मानसिकतेतून बाहेर पडण्याची.माती जिवंत असेल तर शेती जिवंत राहील.शेती जिवंत असेल तर शेतकरी जिवंत राहील.आणि शेतकरी जिवंत असेल तरच समाजाचे भविष्य सुरक्षित राहील. चला तर माती टिकऊया शेती पिकऊया सेंद्रिय शेतीचा जास्तीत जास्त वापर आपल्या शेतामध्ये करूया


**१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी**

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

**DMLT** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स

**PGDMLT** — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

**X-RAY** — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास

**C.T.SCAN** — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास

**E.C.G.** — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास

**O.T. TECHNICIAN** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास

**PG RADIOLOGY** — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc. Physics

**रेडिओलॉजी** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

**फिजिओथेरपी** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

**ऑप्थोमेट्री** — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

**9405109103 | 8830838903**



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँड मल्टी सर्व्हिसेस**

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

**8956362639, 8087880274, 9405109103**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६


## सामाजिक कार्यकर्ते संजय रामराव आडे यांच्या पाठपुराव्याला यश;

**जिंतूर :** परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील मौजे नरसापूर येथील गट क्रमांक २६ संदर्भातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या महसूल प्रकरणात अखेर संबंधित कुटुंबाला न्याय मिळाला आहे. सामाजिक कार्यकर्ते संजय रामराव आडे, जिंतूर यांनी या प्रकरणात सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर तहसीलदार (महसूल), सेलू यांनी दिनांक १३ जुलै २०२६ रोजी आदेश पारित करून सातबारा व फेरफार नोंदीमध्ये आवश्यक दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले आहेत.या प्रकरणात मा. उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी, सेलू यांनी दिनांक १६ डिसेंबर २०२२ रोजी आदेश पारित केला होता. सदर आदेशाच्या अनुषंगाने मौजे नरसापूर येथील गट क्रमांक २६ मधील १ हेक्टर ०० आर क्षेत्राबाबत झालेला फेरफार क्रमांक १०८८, दिनांक १६ जानेवारी २०२० रद्द करून मयत शेषराव शंकर गडदे यांच्या नावाची नोंद पूर्ववत करण्याबाबत कार्यवाही अपेक्षित होती.मात्र, आदेशानंतरही प्रकरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यास विलंब होत असल्याने सामाजिक कार्यकर्ते संजय रामराव आडे यांनी या प्रकरणात लक्ष घातले. संबंधित कुटुंबीयांच्या हक्कासाठी त्यांनी महसूल प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. तसेच उपविभागीय अधिकारी, सेलू यांच्याकडेही प्रत्यक्ष भेटी घेऊन प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात आला.महसूल अभिलेखांची तपासणी करून तहसीलदारांचा निर्णयसदर प्रकरणात सुनावणी घेऊन अर्जदार व गैरअर्जदारांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्यानंतर उपलब्ध मूळ अभिलेख, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी व संबंधित महसूल कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.तहसीलदार (महसूल), सेलू यांनी आपल्या आदेशात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १५५ अन्वये संगणकीकृत ७/१२ मध्ये आवश्यक दुरुस्ती करण्याबाबत निर्देश दिले आहेत.आदेशातील तक्त्यानुसार गट क्रमांक २६ मधील विविध खातेदारांच्या नावावर नोंद असलेल्या क्षेत्रामध्ये आवश्यक ती घट करून संबंधित शेषराव शंकर गडदे यांच्या नावावर क्षेत्राची नोंद करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित महसूल अभिलेखात आवश्यक दुरुस्ती करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.विशेष म्हणजे, "वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्यासाठी या आदेशाने ऑनलाइन फेरफार घेऊन दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी," असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.दीर्घकाळाच्या पाठपुराव्यानंतर कुटुंबाला दिलासाया प्रकरणातील कागदपत्रे, जुन्या फेरफार नोंदी आणि सातबारा उताऱ्यांमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करून संजय रामराव आडे यांनी संबंधित कुटुंबीयांच्या वतीने प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. प्रकरणाचा निकाल लागावा आणि महसूल अभिलेखातील वास्तविक स्थिती स्पष्ट व्हावी, यासाठी त्यांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी केली होती.यापूर्वी या प्रकरणातील विलंबाबाबत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर प्रकरणाची सुनावणी होऊन अखेर १३ जुलै २०२६ रोजी तहसीलदार सेलू यांनी आदेश पारित केला असून संबंधित कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

## महाराष्ट्राच्या सांघिक विजेतेपदात छत्रपती संभाजीनगरच्या खेळाडूंचा सिंहाचा वाटा



**छत्रपती संभाजीनगर :** म्हैसूर, कर्नाटक येथे दि. १ ते ३ ऑगस्ट २०२६ दरम्यान झालेल्या राष्ट्रीय ॲक्रोबॅटिक जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या KRS Sports Academyच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्राच्या सांघिक विजेतेपदात मोलाचा वाटा उचलला.KRSच्या सौम्या म्हस्के आणि पार्थ रामशेटवाड यांनी प्रत्येकी ३ सुवर्णपदके पटकावली. प्रांजल जोंवाल, सलोनी म्हस्के आणि प्रिया आगीवाले यांनी प्रत्येकी १ सुवर्ण, १ रौप्य आणि १ कांस्यपदक मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली.या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय ॲक्रोबॅटिक जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षक व पंच प्रवीण शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघासोबत प्रशिक्षक म्हणून शुभम सरकटे यांनी जबाबदारी सांभाळली, तर Gymnastics Federation of India यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय पंच म्हणून प्रवीण शिंदे यांनी पंचाची जबाबदारी पार पाडली.खेळाडूंची मेहनत, सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना, छत्रपती संभाजीनगर जिल्हा जिम्नॅस्टिक्स संघटना, क्रीडा विभाग, भारतीय क्रीडा प्राधिकरण तसेच विविध क्रीडा पदाधिकाऱ्यांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.या यशामुळे छत्रपती संभाजीनगरच्या जिम्नॅस्टिक्स क्षेत्राचे राष्ट्रीय स्तरावरील योगदान पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, KRS Sports Academyच्या खेळाडूंनी शहरासह महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राला अभिमानाचा क्षण मिळवून दिला आहे.

## श्री संत सावता माळी महाविद्यालयात विद्यार्थी उदबोधन वर्ग संपन्न




**फुलंब्री :** श्री संत सावता माळी महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले. तसेच याप्रसंगी संत सावता माळी महाराज पुण्यतिथीही साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. तर प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. स्नेहल पवार उपस्थित होत्या. बोलत असताना प्रा. पवार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संत सावता माळी यांच्या कार्यावर प्रकाश टाकत संत परंपरा व संतांचे कार्य याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देत असताना सावता माळी यांची कर्मनिष्ठा उलगडून सांगितली. आपण आपल्या कर्मातच ईश्वरभक्ती शोधली पाहिजे. त्याच्याएवढा आनंद दुसऱ्या कशातही नाही. असा संदेश देत संत सावता माळी महाराजांची कर्मदृष्टी सांगितली. तसेच महाविद्यालयात सुरु असलेले विविध विभाग व समित्या यांची माहिती संबंधित विभागप्रमुखांनी दिली. प्रोफेसर डॉ. विजय पांडे यांनी इतिहास विभाग व अभ्यासक्रम यावर माहिती दिली. परीक्षा विभागाविषयी प्रोफेसर डॉ. संजीवकुमार पांचाळ, शारीरिक शिक्षण विभागाविषयी प्रा. डॉ. संदीप जगताप, स्पर्धा परीक्षा व मार्गदर्शन विभागाविषयी प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, सांस्कृतिक विभागाविषयी प्रोफेसर डॉ. राजश्री पवार, राष्ट्रीय सेवा योजना विभागाविषयी प्रोफेसर डॉ. दत्तात्रय येडले, प्रोफेसर डॉ. पांडुरंग कल्याणकर आदी प्राध्यापकांनी आपापल्या विभाग व विषयांची माहिती दिली. या उदबोधन वर्गासाठी ५० ते ५५ विद्यार्थी उपस्थित होते.याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुक्रमे प्रोफेसर डॉ. राजश्री पवार व प्रोफेसर डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले. यावेळी प्रोफेसर डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रोफेसर डॉ. सुरेश मुंढे, प्रा. डॉ. महेश थोरात, प्रा. डॉ. दिनेश कचकुरे, प्रा. भारत कुबेर, प्रा. निर्मला वाघ, प्रा. चंद्रनयन वाघमारे, प्रा. अरुण परदेशी, प्रा. रवींद्र चेपटे, प्रा. स्वाती चनखोरे, प्रा. अंभोरे यांची उपस्थिती होती.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६


## श्रावणाच्या पहिल्या दिवशी अप्पावाडीत ११ फूट महादेव मूर्तीचे अनावरण



**दौलताबाद :** श्रीराम द्वारकाधिश आश्रम अप्पावाडी छत्रपती संभाजीनगर येथे अकरा फूट धानास्थ महादेव मूर्तीचे अनावरण व दर्शन सोहळाश्रावण महिन्याच्या पहिल्या दिवशी दि १३ ऑगस्ट गुरुवारी दहा वाजता पाच गुरुजींच्या उपस्थितीत वैदिक मंत्रोच्चार, षडोपंचार पूजन आणि शक्ती पाठ संपन्न,अभिषेक नंतर अप्पावाडी छत्रपती संभाजीनगर येथे महादेव मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे व चार वाजता महादेव मूर्तीचे अनावरण करण्यात येणार आहेयाच बरोबर पुढे मंदिर परिसरात ५१ फुटी प्रभू श्रीराम यांची भव्य मूर्ती साकारण्यात येणार आहे तसेच आश्रम परिसरात अडीच फूट गणपती मूर्ती,साडे तीन फूट शनिदेव महाराज,रेणुकामातेची तांदळात तर हनुमान महादेवाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार महंत स्वामी डॉ विशालचंद सरस्वती मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहेकार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चेतन तायडे हे आहेतयाअगोदर अप्पावाडी परिसरात परमपूजनीय सदगुरु माई महाराज यांच्या कृपेने आशीर्वादानेआई तुळजाभवानी मंदिराचे भव्य मंदिर उभारण्यात आले आहेबाजूला श्री१०८ सदगुरु डॉ.ष.ब्र. वीरूपक्ष शिवाचार्य महाराज मन मथ धाम मंदिर व तसेचश्री १०८सदगुरु सिद्ध चैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेडा श्रीपत पलसिद्ध सेवा आश्रम उभारण्यात आले आहे यात अजून भर पडून श्रीराम द्वारकाधिश आश्रम स्थापित झाले आहेया कार्यक्रमासाठी खासदार संदीपान भुमरे,पालकमंत्री संजय शिरसाठ,मंत्री अतुल सावे,डॉ भागवत कराड,चंद्रकांत खेरे,महापौर समीर राजूरकर व अन्य मान्यवर हे उपस्थित राहणार आहेकार्यक्रमासाठी लक्ष्मणअप्पा लिंभारे, इश्वरअप्पा लिंभारे, राम अप्पा लिंभारे हे परिश्रम घेत आहेया भव्य कार्यक्रमाचे भाविक भक्तांनी दर्शन व महाप्रसादाचे लाभ घ्यावा असे आव्हान आश्रम समितीच्या वतीने करण्यात आले आहे

## राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि तरुणांमध्ये राष्ट्रभावना जागृत करत भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि तरुणांमध्ये राष्ट्रभावना जागृत करण्याचा संदेश देण्यासाठी शहरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रध्वजाबद्दलचा अभिमान आणि देशप्रेमाची भावना मनात जागवत विद्यार्थी, माजी सैनिक, भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.उमरगा शहरात मुख्यमंत्री बळीराजा शेतपानंद रस्ते योजना समितीचे सहअध्यक्ष शरण पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.११) आयोजित रॅलीची सुरुवात श्रमजीवी कॉलेज येथून करण्यात आली. हातात तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थी, माजी सैनिक, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत रॅली हुतात्मा स्मारक येथे पोहोचली. तेथे हुतात्म्यांना अभिवादन करून रॅलीची सांगता करण्यात आली. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि तरुणांमध्ये राष्ट्रभावना जागृत करण्याचा संदेश देण्यात आला. विशेषतः विद्यार्थी व युवकांचा उत्स्फूर्त सहभाग हे रॅलीचे प्रमुख आकर्षण ठरले. यावेळी रामकृष्णपंत खरोसेकर, मुरलीधर मुगळीकर, कैलास शिंदे, सभापती बसवराज कस्तुरे, जिल्हा परिषद सदस्य रफिक तांबोळी, योगेश राठोड, माजी सभापती मदन पाटील, तालुकाध्यक्ष (ग्रामीण) प्रल्हाद काळे, अनिल सगर, गणेश अंबर, साईराज टाचले, पंचायत समिती सदस्य दगडू पाटील, सागर पाटील, अमर वाले, सतीश सुरवसे, महेश मशाळकर, चंद्रशेखर पवार, सुजित शेळके, दिलीपसिंह गौतम, सदानंद पाटील, सौ. संगिता पाटील, राजू मुल्ला, शिवलिंग माळी, संजय आमाशेट्टी, संजय बिराजदार, यशपाल कांबळे, विनोद पाटील यांच्यासह आदर्श महाविद्यालय व श्री. बसवेश्वर विद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी तसेच शहरातील भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बामणी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद; भोसी येथील घटना



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील बामणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भोसी येथे मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावरून नैराश्यात असलेल्या ३० वर्षीय अत्यल्प भूधारक तरुणांने चिठ्ठी लिहून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी (९ ऑगस्ट) सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. गणेश आश्रोबा ठोंबरे असे मृत युवकाचे नाव आहे. या प्रकरणी बामणी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.गणेश ठोंबरे यांनी रविवारी सायंकाळी आपल्या राहत्या घरात दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर नातेवाइकांनी त्यांना तातडीने जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहिणी मुंडे यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक व ग्रामस्थांनी रुग्णालयात गर्दी केली होती.दरम्यान, बामणी पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी तसेच रुग्णालयात जाऊन प्राथमिक पंचनामा केला. यावेळी मृताच्या खिशात मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही म्हणून मी फाशी घेत आहे सरकारने लवकर आरक्षणाचा प्रश्न सोडवावा अश्या आशयाची चिठ्ठी पोलिसांना आढळून आली दरम्यान मृताच्या नातेवाइकांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश ठोंबरे हे मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावरून नैराश्यात होते. याच कारणातून त्यांनी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी बामणी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलिस हवालदार ठाकूर करीत आहेत.चौकट,कुटुंबाला शासकीय मदतीची मागणीगणेश ठोंबरे यांचे चुलत भाऊ तथा पंचायत समिती सदस्य भास्करराव ठोंबरे यांनी सांगितले की, मागील दोन-तीन दिवसांपासून गणेश हे 'मराठा समाजाच्या आरक्षणाचा काहीच उपयोग होत नाही,' असे म्हणत होते. त्यामुळे ते नैराश्यात होते, असा दावा त्यांनी केला.गणेश यांच्या पश्चात वडील, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शासनाने कुटुंबातील एका सदस्यास शासकीय नोकरी तसेच आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भास्करराव ठोंबरे यांनी केली. यासाठी आपणही पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.सोमवारी सकाळी गणेश ठोंबरे यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदनानंतर नातेवाइकांना मृतदेह स्वाधीन करण्यात आला.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६


## माळीवाड्यात अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** संत शिरोमणी सावता माळी महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त माळीवाडा येथे ४ ते ११ ऑगस्टदरम्यान आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व सामूहिक संत सावता महाराज चरित्र पारायण सोहळ्याची मंगळवारी (ता. ११) भक्तिमय वातावरणात सांगता झाली.सप्ताहादरम्यान संत सावता महाराज चरित्र पारायण, प्रवचन, कीर्तन, रामकथा तसेच विविध ह. भ. प महाराज भजनी मंडळांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमांना मोठा प्रतिसाद दिला.मंगळवारी सकाळी श्री संत सावता महाराज यांच्या मूर्तीचा अभिषेक व संजीवन समाधी सोहळा झाला. त्यानंतर सकाळी नऊ वाजता गावातून सावता महाराजांच्या प्रतिमेची दिंडी मिरवणूक काढण्यात आली. ग्रामस्थांनी घरासमोर आकर्षक रांगोळ्या काढून प्रतिमेचे पूजन केले. यानंतर ह.भ.प. शंकर बप्पा मुळे (घाणेगाव) यांचे काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनानंतर दहीहंडीचा कार्यक्रम झाला. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी आसाराम लक्ष्मण हेकडे (अप्पा), चंद्रकांत हेकडे, तुकाराम मुळे, वैजिनाथ आढाव,एमनाथ मुळे, गंगाधर मुळे, सुधाकर हेकडे, सुभाष मुळे, कृष्णा गजानन मुळे, नारायण मुळे यांच्यासह सावता बाबा संस्थान, सावता महाराज मंडळ व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# प्रशासनाने तहसीलदारांना तातडीच्या कार्यवाहीचे आदेश

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर येथील वक्फ संस्था जामा मस्जिद / मजारशहा आरेफ साहेब यांच्या सेवा इनाम व वक्फ मालमत्तेशी संबंधित सर्वे क्रमांक १४, १७, १८, २९, ३०, ११०, २१६, २२३, २२४ तसेच मौजे वरूड (नृसिंह) येथील गट क्रमांक ५९ व ६० यांच्या सातबारा उताऱ्यावरील मालकी रकान्यात शासन निर्णय व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित वक्फ संस्थेचे नाव नोंदविण्याबाबत अंतिम निर्णय न झाल्याच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते शेख अहेमद शेख समद व पठाण हारुण खान अबदार खान यांनी १४ ऑगस्ट २०२६ पासून तहसील कार्यालय, जिंतूर येथे लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.या संदर्भात अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी ५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये तहसीलदार, जिंतूर यांना संबंधित निवेदनाची प्रत पाठवून प्रकरणातील लागू असलेले शासन निर्णय, नियम, कायदे, शासन अध्यादेश तसेच न्यायालयीन आदेश (लागू असल्यास) विचारात घेऊन नियमानुसार तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.तसेच निवेदनकर्त्यांशी संवाद साधून त्यांना उपोषणापासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचेही आदेश तहसीलदारांना देण्यात आले आहेत. या आदेशाची प्रत पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन जिंतूर यांनाही पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे. निवेदनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, सन २०२१ पासून या प्रकरणात जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच जिल्हा वक्फ अधिकारी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून, शासन निर्णय व विविध अधिकाऱ्यांच्या आदेशांनंतरही संबंधित महसूल अभिलेखांमध्ये आवश्यक ती नोंद अद्याप झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाने अंतिम निर्णय घेऊन आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी त्यांची मागणी आहे.दरम्यान, अतिरिक्त जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या आदेशामुळे या प्रकरणात प्रशासनाने अधिकृतरीत्या दखल घेतली असून, आता तहसील प्रशासनाकडून पुढील काय कार्यवाही होते, याकडे संबंधित नागरिक आणि निवेदनकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

# कालिकादेवी विद्यालयात, 'प्रश्नमंजुषा स्पर्धा' संपन्न



**शिरूर कासार :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचालित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि.बीड येथे विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली,'महाराष्ट्र शासन' आदेशान्वये माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड.यांच्या परिपत्रकानुसार "राष्ट्रीय नशामुक्ती जनजागृती अभियान-२०२६" अंतर्गत 'नशामुक्ती प्रतिज्ञा पंधरवडा' राबविण्यात येत आहे.याचाच भाग म्हणून विद्यालयात 'नशामुक्ती अभियान' या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न झाली.नशा व व्यसनाधीनतेमुळे विद्यार्थी व युवक तसेच समाजाच्या आरोग्यावर व भवितव्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता, विद्यार्थ्यांमध्ये नशामुक्ती बाबत जनजागृती, आरोग्यदायी जीवनशैली, व्यसनापासून दूर राहण्याची सकारात्मक मानसिकता, आणि सामाजिक जबाबदारी निर्माण करण्यासाठी शाळास्तरावर विविध जनजागृती उपक्रम राबविणे आवश्यक आहे.म्हणून विद्यालयाने आयोजित केलेल्या 'नशामुक्ती अभियान या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धेत' इयत्ता इ.५ वी ते १२ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेतला होता. यावेळी परीक्षेला बसलेले सर्व विद्यार्थी, तसेच विद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, परीक्षा विभाग प्रमुख व, पर्यवेक्षण करणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.





महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६

# भोवरा, खुरपं आणि माऊस - भूमीजनांच्या श्रमनिष्ठेची कविता




शब्द स्नेही सन्मित्र कवीवर्य प्रदिप देशमुख यांची अस्सल शेती मातीशी झुंजून श्रमीक म्हणून घामाची नाळ जोडली गेली.ती शब्दांच्या गुंफणाची.आईच्या वाचन संस्कारातून व कवी स्नेहांने एकवार कविवार इतका निस्सीम भक्तीने केला म्हणून ही कविता संस्कारीत होऊन आली आहे.गरगर भोवरा बालमनाच्या तळहातावर घेऊन.कवितेचा भोवरा बिंगत राहिला.पुन्हा नव्याने हाच भोवरा खुरपं आणि माऊस घेऊनअतिशय आशय संपन्न सृजन समर्पक वास्तव मांडणारी ही कविता.मायमातीची मुठभर ओंजळ तर आहेच पण आपल्या माय माऊलीचे ललाट ही दाखवते.ते चित्रकार सरदार जाधव यांनी अतिशय आशय संपन्नतेन मुखपृष्ठ केले आहे.कवी अविनाश पाईनकर यांच्या सृजन समर्पक स्पर्शाने अतिशय देखणे पुस्तक कलाकृती झाली आहे.माय माऊलीचा डोईभरून पदर पदराचा काठ,कपाळी गरगर फिरणारं भोवऱ्याचं कुंकू.ते थेट आधुनिक माऊस ची दोरी घेऊन आलेलं.बालपणीचा खेळ भोवरा आणि त्याची दोरी.शेती मातीशी नाळ म्हणून खूरपं.तनकट काढणारं.वावर निर्मळचटक करणारं खुरपं काळाचा गळ गळून पडला आणि आम्ही तंत्रज्ञानाचे शिलेदार झालो. हाती माऊस आला.या माऊसने माणसच्या जगण्याची हौस केली.कवीचं मन भिंगर भिंगरी होऊन रानशिवाराची मनमुक्त वहिवाट देऊन ही कविता जाते.'चुंबून घेईन त्या हातांनी'अशीचं काही पाहिन स्वप्ने,जपत जाईल जीवपाड ही या मातीची रूप बावणे' या महीभूमीचा ऋणानुबंध व्यक्त करतांना कवी लिहितो."जितके खणतो खोल भूमीला, ओलं सरकते तितकी खाली.शमली नाही अजून परंतु तहान अघोरी माझ्या मधली"(पृ.१२) श्रमिकांच्या घामाचे संचित ही कविता संयत मनोभूमिकेतून उजागर करते.कष्टकरी मजूरांच्या तळहातावरील फोडाला एक मायाळू स्नेहाळू ओंजळ म्हणजे हातांना चुंबून घेणे.मजुरांच्या कष्टाला सलाम करीत ही त्यांच्या गळयात ममत्वाचे हार पडावेत इतकी हृदयस्पर्शी सृजनशीलता आत्मिक स्वानुभवातून आलेली आहे.'अशीच काही स्वप्ने,किती जपावे,या कवितेचा हा श्रमिकांचा आहे.तर 'पोरी'ही आपल्या गावशिवांच्या लेकीबाळी जेव्हा दुर निघुन सासरी जातात.त्या मायबापाचा नावं लौकिक करतात पण इथे एक सृजनशील स्नेहाळू मर्मबंधाची भावना अशी,"किती अडवल्या तरी न अडल्या पंख उभारून उडल्या पोरी,बांधायचे तोडून बंधन लखलखताना दिसल्या पोरी"(पृ.१६) हे नक्कीचं कौतुकाचं अभंगपण आहे.इथल्या नतदृष्ट अनभिज्ञ व्यवस्थेवर कुणी हरिणीचं रूप घेऊन 'मारीच'येतो ही मृगजळी खोटी आशा घेऊन जगणारा कुणबीतला आत्मा हरण होतो तरीपण या मायमातीवरची निष्ठा कायमचं आहे असा सुंदर आशय संपन्न आशावाद ही कविता देऊन जाते.या जळत्या लाटा आहेत.नदी मनातून वाहते आहे.खोल डोहतळी कायमचं वाहते आहे पण हे भणंगलेपण जेव्हा येते तेव्हा लकाकी दामिनीपरी ती निखळून पडते. हा काळ वाटा शोधतचं असतो जशा 'मुशाफिरीचा वाटा'हे मोहमायेच्या जगताचे जागलेपण.नेमका तळहातावर काळ हा मुशाफिरीच्या वाटा देऊन जातो.ही 'गणित' नुसती वजाबाकीची आहेत तरीही यावर मात करीत जो मोह माया सोडून मुक्त जगतो तो खरा समाधानी ती कविता अशी,"बोनस डीए इंक्रीमेंन्टला, मिटक्या मारत भोगा.कष्टकऱ्याचा भाजीपाला, आठ आण्याला मागा"कंसामध्ये आहेस तोवरी,वाजव आपले ढोलया शून्याशी लढतांना,मग हरवून बसशील मोल"(पृ.२२)या जगण्याच्या व्याकरणात अंगाई चुकली तर जीवनात पस्तावा करवा लागतो 'चुकली अंगाई 'ही मनस्वी कविता.ही कृषीवंत कुळवंत बापाची पुण्याई घेऊन आलेली कविता अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक भाव व्याकुळ करून जाते.'नंतर' दारावर थाप,आठवणीचा जोगिया,रजनीचे प्राक्तन,या प्रतिमातून आशय घनता ठळक होते.'मला न मंजूर, शब्द माझे, तीर्थरूप बाबांना ही हळवी करून जाते.पखं फुठलेलं मन, पहाट, अखेर सारे त्याच्या हाती,पेरते व्हा, मल्हार,जागल,झाले मिरुग डोये,मन भिंगर भिंगरी,या कृषीवल संस्कृतीचा वारसा सांगणारी कविता आहेत.ऐन हंगामाच्या घाती.हे अनादी अनंत काळाचं भाकीत आहेच.तरीही आम्ही 'पोळा' साजरा करतो कारण बैलांच्या श्रमाच्या उपकाराची परतफेड म्हणून.गंजिफा, रंगबावरा,रंगू,आज, अजिठा,सूर सापडला पुन्हा,हरवाला आहे,काय झाले,खोल मनाच्या आत,या कवितेचा सृजनशील भाव म्हणजे शेतकरी शेतमजूर कामगार गोरगरीबांची कष्टकरी मजूरांच्या तळहातावरील श्रमिकांची शब्दांगार आहे जसा,"आज इथे मी सिमेंटभोगी,माती पासून दुरावलेला.तुकडे तुकडे होऊन श्रावण,सडकेवरती विखूरलेला"(पृ ५०)तर या सृष्टीतील विश्व शांतीदुताचा अतिशय तरल भावबंध कवीने ऋण म्हणून व्यक्त केला आहे.तथागत गौतमाची ही सविनय साधक कविता आहे.सहा अंभग रचना म्हणजे एक आत्मिक बळ देणारे माय बाप,शेती माती,व ज्ञान अध्यात्म यांचा संदेश यातून येतो.'स्वयप्रकाशी' व संविधान या कविता विश्ववंदनीय डॉ बाबासाहेबांच्या सम्यक विचारांच्या बांधिलकीचे अनंत ऋण ही कविता व्यक्त करते.'मराठी मायभाषेचा गौरव करत, जपून ठेवा सुगंध सारे हे सर्व अंतरंगी उजेड माळून घ्या माणूस म्हणून जगताना ही सविनय विचार मनी बाळगा.अशी तरलं सजग भान देऊन जाणारी ही कविता.सरवा या भागात कवी प्रदीप जी लिहितात."आम्हाला आमची माती जगवेल/उगवून येऊ पुन्हा पुन्हा/तुमच्या गारपीट झेलण्यासाठी/पण असे मुळावर विष ओतून/करु नका आमच्या मातेला वांझ/तसे केले तर/काही खरे आमचे/आणि तूमचेही/(पृ.६५)अशी ही शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनेची अस्सल ठणक व्यक्त करणारी कविता आहे.एक मन गहिवरून टाकणारी तत्कालीन ते समकालीन परिप्रेक्ष्यातील कविता.'हक्क सोड,सही कर,'बांधावरचाआंबा तोडू नको, सावली राहू दे,हिरी जवळची बोरं,चिंच जांभूळ,राहू दे,गाईगुरासाठी पडीत ठेवत जा.हे बहिणीचे बोल अनमोल होते.पुढे सारी नी सगळीचं धुळधाण झाली.शेती बांधावर आली म्हणून 'विलगीकरण' ते जणू रघत पारखेपणा आला कवीने आशावाद व्यक्त केला 'मातीपासून, माणसाचे,माणसापासून माणसाचे विलगीकरण नको.तर आजचे शेतीचे वास्तव नागराची जागा पोकलॅने घेतली.मायमातीचा हा कोलाहल मन उद्विग्न करतो.शेतकऱ्यांचा फक्त दिखाऊ कळवळा,'तुम्ही आमची फिकीर करु नका 'मातीच या सृष्टीची उत्पत्ती आहे.माती कधीचं धोका देत नाही.तर काही श्रध्देय व्यक्तीचा आदरभाव म्हणून त्यांच्या विषयीची ऋणाई व्यक्त करणाऱ्या कविता जसे ' डॉ पंजाबराव देशमुख, दादा पाटील यांच्या विषयी अप्रतिम कविता.तुला वगळता येत नाही,दगडाच्या कविता, मागास, काही जुने हिशोब, दधिची,होय मला लिहायचे होते,काॅन्सनट्रेशन कँप,सरवा,वेडा,प्रकाशसूक्त, उजेड,सावर सावर बाई, फुलपाखरू,या संपूर्ण कविता कवीच्या चिंतन सृष्टीची अमोघ शक्ती आहे.या समकालीन वास्तवाची प्रखर भान देणारी ही कविता आहे.शेवट 'भोवरा खुरपं आणि माऊस' आई मी भोवरा खेळायचो!तळहातावर झेलून गरगर नांदवायचो त्याचं हातात तू खूरपं दिलं मी निंदन करतं राहिलो."आता माझ्या मुलाच्या हातात माऊस पाहतो तेव्हा/किती कौतुक वाटते मला/मी कुतुहलाने निहाळतो/माॅनिटरवर त्यांनी मांडलेला गेम"(पृ.९६)आज भंयकर ही श्रमाचीप्रतिष्ठा मनाची एकाग्रता व भूमीनिष्ठता या कवितेने दिली.संशोधक अभ्यासक डॉ प्रमोद मुघाटे प्रस्तावनेत लिहितात "प्रदिप देशमुख यांच्या काव्य विश्वाच्या केंद्रस्थानी 'भोवरा खुरपं आणि माऊस' या प्रतिमा जशा कालसूचक आहेत,तशा मूल्य दर्शक आहेत.आजचा काळ निर्मम असा मूल्यभ्रष्ट झाला आहे असे कवीला वाटते.भोवरा खूरपं या गोष्टी मातीशी नाते सांगणाऱ्या आहेत.माती म्हणजे निसर्ग,माती म्हणजे मनुष्य, निसर्ग, आणि प्राणी सृष्टीच्या परस्पर संबंधाचे सेंद्रिय नाते आणि माती म्हणजेच मानवी मूल्यांचे अंतिम अधिष्ठान,असा एक भाव या कवीच्या सर्वच कवितेच्या केंद्रस्थानी दिसतो.(पृ.५प्रस्तावना) अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक.तर पाठराखण ख्यातनाम समीक्षक डॉ प्रा.रणधीर शिंदे यांची आहे."शेतकऱ्यांच्या दृष्टीने जागतिकीकरण म्हणजे अगतिकीकरण असल्याची भावना या कवितेत व्यक्त होते.तरीही एकंदरीत आजच्या काळातील कष्टकऱ्यांच्या जीवनात विषयीचा गडद आस्थाभाव आणि 'कौन ठगवा नगरीया, लुटल हो'असा अस्वस्थ करणारा भाव समर्थपणे व्यक्त करणारी ही कविता आहे (प्रा.रणधीर शिंदे)ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची भूमिका घेऊन आलेली आहे.आविनाश पोईनकर यांचे संपादन.अतिशय उत्तम.आदरणीयश्रीपद प्रभाकर जोशी लिहितात "आशयाच्या अस्सल बियाण्यामुळे त्यांची कविता समृद्धतेची हिरवाई पांघरून प्रगटते.शोषितांच्या दु:खाचा सल अतिशय संयत शब्दात व्यक्त करते.हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे.हे मनस्वी सृजनशील समृद्ध सकारात्मक विचारधारेची ही कविता आहे.शब्द स्नेही प्रदिप देशमुख हार्दिक शुभेच्छा.



**भोवरा,खुरपं आणि माऊस(कवितासंग्रह)प्रकाशक:- अविनाश पोईनकर स्तंभ पब्लिकेशन हाउस, चंद्रपूर कवीवर्य:- प्रदिप देशमुख, चंद्रपूर मुखपृष्ठ:-सरदार जाधव रेखाटने:-प्रमोद अणेराव प्रथमावृती:-३० जून २०२६पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना संवाद:- ९९७५१३७३३७**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६

# युवाशक्ती : राष्ट्रनिर्मितीची नवी दिशा- डॉ. राजेंद्र बगाटे

दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. युवक हे कोणत्याही देशाचे वर्तमान आणि भविष्य घडविणारे सर्वांत महत्त्वाचे घटक मानले जातात. तरुणाईमध्ये असलेली ऊर्जा, कल्पकता, धाडस, परिवर्तनाची आस आणि नव्या वाटा शोधण्याची क्षमता समाजाच्या प्रगतीला नवी दिशा देऊ शकते. त्यामुळे युवा दिन हा केवळ युवकांच्या गौरवाचा दिवस नसून, त्यांच्या प्रश्नांचा, अपेक्षांचा, संधींचा आणि जबाबदाऱ्यांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. जगातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि तांत्रिक परिवर्तनामध्ये युवकांची भूमिका दिवसेंदिवस अधिक महत्त्वाची होत आहे. भारतासारख्या तरुण लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असलेल्या देशासाठी तर युवाशक्ती ही विकासाची सर्वांत मोठी भांडवलशक्ती आहे. या शक्तीला योग्य शिक्षण, कौशल्य, रोजगार, समान संधी आणि सकारात्मक दिशा मिळाली, तर भारत अधिक सक्षम, समृद्ध आणि न्याय्य राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहू शकतो.आंतरराष्ट्रीय युवा दिनाची सुरुवात युवकांशी संबंधित प्रश्नांकडे जागतिक पातळीवर लक्ष वेधण्यासाठी झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने युवकांच्या सामाजिक सहभागाला, त्यांच्या हक्कांना आणि विकासातील योगदानाला महत्त्व देत या दिवसाला विशेष स्थान दिले. जगभरातील युवकांना भेडसावणाऱ्या शिक्षण, रोजगार, गरिबी, असमानता, मानसिक ताण, सामाजिक बहिष्कार, हवामान बदल, डिजिटल परिवर्तन आणि शांतता-सुरक्षा यांसारख्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हा दिवस महत्त्वपूर्ण ठरतो. युवकांना केवळ भविष्यातील नागरिक म्हणून पाहण्याऐवजी वर्तमानातील सक्रिय भागीदार म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या मतांना स्थान देणे, निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे आणि त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हे आधुनिक लोकशाहीचे महत्त्वाचे लक्षण आहे.भारताच्या संदर्भात युवकांचे महत्त्व अधिक व्यापक आहे. देशाची मोठी लोकसंख्या तरुण आहे. त्यामुळे भारताकडे जगातील सर्वांत मोठ्या युवा शक्तींपैकी एक शक्ती उपलब्ध आहे. ही लोकसंख्यात्मक स्थिती भारतासाठी मोठी संधी आहे; मात्र ती आपोआप विकासाचे साधन ठरत नाही. युवकांना दर्जेदार शिक्षण, बाजारपेठेला अनुरूप कौशल्ये, रोजगाराच्या संधी, उद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण आणि सामाजिक सुरक्षितता मिळाली तरच ही लोकसंख्यात्मक संधी आर्थिक व सामाजिक प्रगतीमध्ये रूपांतरित होऊ शकते. अन्यथा बेरोजगारी, अपुरी रोजगारक्षमता, आर्थिक असुरक्षितता आणि सामाजिक निराशा या समस्या निर्माण होऊ शकतात. म्हणूनच 'तरुण भारत' ही संकल्पना केवळ लोकसंख्येच्या आकडेवारीपुरती मर्यादित न राहता सक्षम, सुशिक्षित, कुशल, संवेदनशील आणि जबाबदार भारताच्या निर्मितीशी जोडली पाहिजे.युवकांच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, विवेकशील विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्यांची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. आजच्या बदलत्या जगात पारंपरिक ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञान, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि उद्योजकता यांसारख्या कौशल्यांची गरज वाढत आहे. त्यामुळे युवकांना केवळ परीक्षाभिमुख शिक्षण देण्याऐवजी ज्ञान आणि कौशल्य यांचा समन्वय साधणारे शिक्षण देणे आवश्यक आहे. मातृभाषेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण, उच्च शिक्षणाच्या समान संधी आणि ग्रामीण व वंचित विद्यार्थ्यांपर्यंत डिजिटल साधनांची उपलब्धता यांना विशेष महत्त्व द्यावे लागेल.आजच्या युवकांसमोरील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी रोजगाराचे आव्हान महत्त्वाचे आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतरही अनेक तरुणांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार मिळत नाही. काही युवकांना रोजगार मिळतो; परंतु त्यांना त्यांच्या कौशल्यांच्या तुलनेत कमी उत्पन्न किंवा अस्थिर रोजगार स्वीकारावा लागतो. ग्रामीण भागातील युवकांसाठी ही समस्या अधिक गंभीर आहे. शेतीवरील वाढता आर्थिक दबाव, मर्यादित औद्योगिक संधी आणि शहरांकडे होणारे स्थलांतर यामुळे ग्रामीण तरुणांसमोर अनेक प्रश्न उभे राहतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, कृषीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि सामाजिक उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्रत्येक तरुणाने सरकारी नोकरीचीच अपेक्षा करण्याऐवजी रोजगार निर्माण करणारा उद्योजक होण्याची संधीही समाजाने उपलब्ध करून दिली पाहिजे.डिजिटल क्रांतीने युवकांसमोर अभूतपूर्व संधी निर्माण केल्या आहेत. आज एका छोट्या गावातील युवकाला जगभरातील ज्ञानसंपदा काही क्षणांत उपलब्ध होऊ शकते. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल सेवा, स्वतंत्र व्यवसाय, मुक्त व्यावसायिक काम, सर्जनशील उद्योग आणि नवउद्योजकता यामुळे तरुणांसाठी नवीन क्षेत्रे खुली झाली आहेत. परंतु डिजिटल साधनांचा वापर विवेकपूर्ण पद्धतीने करणेही तितकेच आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील चुकीची माहिती, अफवा, दिशाभूल करणारे संदेश, ऑनलाइन फसवणूक, अतिरेकी वापर आणि आभासी जगाचे वाढते आकर्षण यामुळे युवकांच्या विचारक्षमतेवर आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होऊ शकतो. म्हणून डिजिटल साक्षरतेबरोबरच डिजिटल जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे; ते जीवनाचा पर्याय नाही, हे युवकांनी लक्षात ठेवले पाहिजे.युवकांच्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक स्वास्थ्य आणि भावनिक सक्षमता यांनाही महत्त्वाचे स्थान आहे. स्पर्धेचे वाढते स्वरूप, शैक्षणिक अपेक्षा, रोजगाराची अनिश्चितता, आर्थिक दबाव, सामाजिक तुलना आणि समाजमाध्यमांमधून निर्माण होणारी कृत्रिम यशाची प्रतिमा यामुळे अनेक तरुणांवर मानसिक दबाव वाढत आहे. अपयशाला सामोरे जाण्याची क्षमता, स्वतःच्या भावनांची जाणीव, संवाद साधण्याची सवय आणि आवश्यकतेनुसार योग्य मदत घेण्याची सकारात्मक वृत्ती युवकांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे. कुटुंब, शैक्षणिक संस्था आणि समाज यांनी युवकांच्या अडचणींकडे केवळ शिस्तीच्या किंवा यश-अयशाच्या चौकटीत न पाहता संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. मानसिकदृष्ट्या सक्षम युवकच आव्हानांचा सामना करून समाजाच्या विकासात प्रभावी योगदान देऊ शकतो.युवक आणि सामाजिक परिवर्तन यांचे नाते अतूट आहे. इतिहासात अनेक सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींमध्ये तरुणांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक तरुण क्रांतिकारक, समाजसुधारक आणि विचारवंत यांनी देशासाठी मोठे योगदान दिले. महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा अभ्यास केला असता तरुणाईच्या ऊर्जा आणि विचारशक्तीचे महत्त्व स्पष्ट होते. आजच्या काळातील युवकांनी इतिहासातील या प्रेरणांचा अर्थ केवळ गौरवकथांमध्ये शोधू नये, तर सामाजिक जबाबदारी, समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांना आपल्या आचरणात स्थान द्यावे.लोकशाहीच्या बळकटीकरणामध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाही केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसून प्रश्न विचारणे, सार्वजनिक धोरण समजून घेणे, सामाजिक समस्यांवर चर्चा करणे, कायद्याचा आदर करणे आणि सार्वजनिक हितासाठी सक्रिय सहभाग घेणे हीदेखील लोकशाहीचीच प्रक्रिया आहे. युवकांनी राजकीय आणि सामाजिक घडामोडींकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. जात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा अफवांच्या आधारावर मतनिर्मिती करण्याऐवजी संविधानिक मूल्ये, विवेक, तथ्य आणि सार्वजनिक हित यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तरुण पिढीने लोकशाहीतील आपली भूमिका समजून घेतली, तर समाजातील ध्रुवीकरण कमी करून संवाद आणि सहकार्याची संस्कृती विकसित होऊ शकते.भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुतेची मूल्ये दिली आहेत. युवकांनी या संविधानिक मूल्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील विषय न मानता जीवनमूल्य म्हणून स्वीकारले पाहिजे. स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, जातीय भेदभावाचा विरोध, वंचित घटकांबद्दल संवेदनशीलता, विविधतेचा आदर आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण या मूल्यांमधूनच आधुनिक भारताची निर्मिती होणार आहे. युवकांच्या विचारविश्वात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधानिक नैतिकता रुजविणे ही कुटुंब, शिक्षणसंस्था आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.युवकांच्या सहभागाशिवाय पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्टही पूर्ण होऊ शकत नाही. हवामान बदल, जलसंकट, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या भविष्यातील पिढ्यांवर सर्वाधिक परिणाम करणार आहेत. त्यामुळे युवकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, जलसंधारण, वृक्षसंवर्धन, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकासाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तरुणाईने पर्यावरणाच्या प्रश्नांकडे केवळ आंदोलनाच्या दृष्टीने न पाहता दैनंदिन जीवनातील सवयी बदलण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.ग्रामीण युवकांकडे विशेष लक्ष देणे ही आजची गरज आहे. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये क्षमता, श्रमशीलता आणि नवकल्पनाशक्ती मोठ्या प्रमाणात आहे; मात्र त्यांना संधींची कमतरता भासते. आधुनिक शेती, कृषीप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, पर्यटन, हस्तकला, ग्रामीण उद्योग, डिजिटल सेवा आणि स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय यांच्या माध्यमातून ग्रामीण युवकांसाठी रोजगारनिर्मिती करता येऊ शकते. गावातील युवकांना गावातच गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योजकतेच्या संधी मिळाल्या, तर ग्रामीण स्थलांतराचा दबाव कमी होऊ शकतो. ग्रामीण युवक हा केवळ रोजगाराचा शोध घेणारा घटक न राहता आपल्या गावाच्या विकासाचा नेतृत्वकर्ता बनू शकतो.युवतींच्या सक्षमीकरणाशिवाय युवाशक्तीचा पूर्ण उपयोग होऊ शकत नाही. शिक्षण, रोजगार, सुरक्षितता, आरोग्य, डिजिटल प्रवेश, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयप्रक्रियेत समान सहभाग या संधी युवतींना मिळणे आवश्यक आहे. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान वाढवायचे असेल, तर मुलींच्या शिक्षणाला आणि त्यांच्या स्वावलंबनाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील युवतींसाठी विशेष कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. महिला सक्षम झाल्या की कुटुंब, समाज आणि अर्थव्यवस्था या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.आजच्या युवकांसाठी मूल्याधिष्ठित नेतृत्वाची गरज आहे. नेतृत्व म्हणजे केवळ पद, अधिकार किंवा प्रसिद्धी नव्हे. नेतृत्व म्हणजे जबाबदारी स्वीकारणे, इतरांना सोबत घेणे, अडचणींवर उपाय शोधणे आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणे. युवकांनी समाजमाध्यमांवरील प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष सामाजिक कार्याला महत्त्व दिले पाहिजे. रक्तदान, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, साक्षरता, पर्यावरण संरक्षण, ग्रामविकास, सामाजिक समता आणि नागरिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये तरुणांनी सहभाग घेतला तर समाजातील सकारात्मक शक्ती अधिक बळकट होईल.युवकांनी स्वतःच्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. देशाकडून संधी मिळाव्यात अशी अपेक्षा करताना देशासाठी आपले योगदान काय असू शकते, हा प्रश्नही प्रत्येक तरुणाने स्वतःला विचारला पाहिजे. प्रामाणिकपणे शिक्षण घेणे, कौशल्य आत्मसात करणे, कायद्याचा आदर करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरणाची काळजी घेणे, सामाजिक सलोखा राखणे आणि गरजू व्यक्तींना मदत करणे ही राष्ट्रनिर्मितीचीच कामे आहेत. देशभक्ती केवळ घोषणांमध्ये नसून आपल्या दैनंदिन आचरणात दिसली पाहिजे.आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने शासन, शिक्षणसंस्था, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी युवकांकडे अधिक विश्वासाने पाहण्याची गरज आहे. युवकांना केवळ समस्या म्हणून पाहण्याऐवजी ते समस्यांचे समाधान देऊ शकतात, असा दृष्टिकोन विकसित करावा लागेल. त्यांना निर्णयप्रक्रियेत स्थान, नवकल्पनांना प्रोत्साहन, संशोधनासाठी संधी, कौशल्यविकासासाठी साधने आणि उद्योजकतेसाठी आवश्यक आधार दिला पाहिजे. शहरी आणि ग्रामीण, श्रीमंत आणि गरीब, डिजिटल साधनांनी सक्षम आणि डिजिटल सुविधांपासून वंचित अशा युवकांमधील दरी कमी करण्यासाठीही ठोस प्रयत्न आवश्यक आहेत.आज भारतासमोर विकसित आणि समताधिष्ठित राष्ट्र घडविण्याचे मोठे स्वप्न आहे. हे स्वप्न केवळ शासनाच्या योजनांनी पूर्ण होणार नाही. त्यासाठी जागरूक, कुशल, सर्जनशील आणि जबाबदार नागरिकांची आवश्यकता आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी युवक असतील. भारताची युवा शक्ती जर ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक बांधिलकी आणि संविधानिक मूल्यांशी जोडली गेली, तर देशाच्या विकासाला अभूतपूर्व गती मिळू शकते. मात्र त्यासाठी युवकांना संधी देण्याबरोबरच त्यांच्यावर विश्वास ठेवण्याचीही गरज आहे.आंतरराष्ट्रीय युवा दिन हा त्यामुळे केवळ उत्सवाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या युवकांना कोणत्या संधी देत आहोत, त्यांच्या प्रश्नांकडे किती गांभीर्याने पाहत आहोत आणि त्यांच्या स्वप्नांना किती व्यापक आकाश देत आहोत, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. युवक ही राष्ट्राची केवळ भविष्यातील आशा नाही; ते वर्तमानातील परिवर्तनाचे सक्रिय शिल्पकार आहेत. त्यांच्या हातात ज्ञानाची शक्ती, विचारांची प्रगल्भता आणि तंत्रज्ञानाची साधने आहेत. या शक्तीला योग्य दिशा मिळाली, तर सामाजिक विषमता कमी करता येईल, आर्थिक विकासाला चालना देता येईल आणि लोकशाही अधिक सक्षम करता येईल.म्हणूनच आजच्या युवा पिढीसमोर एकच संदेश असायला हवा तो म्हणजे स्वप्ने मोठी पाहा, परंतु त्यासाठी परिश्रम करण्याची तयारी ठेवा; तंत्रज्ञानाचा स्वीकार करा, परंतु विवेक सोडू नका; यशाचा पाठपुरावा करा, परंतु मूल्यांचा त्याग करू नका; स्वतःच्या प्रगतीचा विचार करा, परंतु समाजाची जबाबदारी विसरू नका. राष्ट्रनिर्मिती ही केवळ नेत्यांची किंवा शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक पिढीची सामूहिक जबाबदारी आहे. त्या जबाबदारीचे सर्वाधिक सामर्थ्यवान वाहक म्हणजे युवक. म्हणूनच सक्षम युवक, समताधिष्ठित समाज आणि विकसित भारत ही तीन उद्दिष्टे परस्परांपासून वेगळी नसून एकमेकांशी घट्ट जोडलेली आहेत. युवाशक्तीला योग्य दिशा, समान संधी आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व मिळाले, तर भारताच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग निश्चितच अधिक भक्कम होईल. आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने हीच युवाशक्ती राष्ट्राच्या प्रगतीची नवी ऊर्जा ठरावी, हीच अपेक्षा.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६

# विलंबाने मिळणाऱ्या भूसंपादन मोबदल्याच्या व्याज दरात सुधारणा

**बीड (भगवंत पाळवदे) :** भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यास विलंब झाल्यास त्यावर दिल्या जाणाऱ्या व्याजामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. आता हा व्याजदर रिझर्व्ह बँक व्यावसायिक बँकांना ज्या व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देते त्यापेक्षा एक टक्का अधिकचा व्याजदर असणार आहे. शासनाच्या विविध विकास प्रकल्प, योजनांसाठी संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीचा प्रकल्पाची निकड विचारात घेऊन आगाऊ ताबा घेणे आवश्यक ठरते. निवाड्यापूर्वी जमीन शासनास सुपूर्द करण्यात येत असल्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ नुसार बाधित व्यक्तीला मोबदल्याच्या रकमेवर विलंबामुळे व्याज दिले जाते. हे व्याजदर व बँकेचे कर्जावरील प्रचलित व्याजदर यामध्ये तफावत असल्याने अधिनियमातील कलम ७२ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार भारतीय रिझर्व्ह बँक व्यावसायिक बँकांना ज्या दराने कर्ज देते त्यामध्ये एक टक्का अधिक दराने व्याज देण्यास येणार आहे. त्यानुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ७२ मध्ये सुधारणा करण्यात येणार. --००--(महसूल विभाग)नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांकरिता जमीन खरेदीच्या हस्तांतरण शुल्कात सूट राज्यात नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना गती मिळावी यासाठी नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांकरिता खरेदी करण्यात आलेल्या जमिनीच्या हस्तांतरण शुल्कात २५ टक्के सूट देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

महाराष्ट्र नवीकरणीय उर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण-२०२५ ते २०३५-३६ यामध्ये महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीनविषयक कायद्यांतील तरतुदीनुसार २५ टक्के हस्तांतरण शुल्क सूट समाविष्ट करण्यात येणार आहे. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांकरिता खरेदी करण्यात आलेल्या जमिनीचे ग्रुप कंपनीअंतर्गत अथवा उपकंपनीअंतर्गत हस्तांतरणासाठी चालू वार्षिक मूल्यदर तक्त्यानुसार जमिनीच्या बाजारमूल्याच्या २५ टक्के दराने हस्तांतरण शुल्क जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा करावे लागत होते. यामुळे प्रकल्पांवर आर्थिक भार पडत असल्याने आणि ऊर्जा प्रकल्प लांबणीवर पडत असल्याने या शुल्कात सूट देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. ही सूट देतानाच जमिनीचा अंतिम वापर नवीकरणीय ऊर्जा विकासासाठी करणे आवश्यक आहे. जर एखाद्या कंपनीने अंतर्गत हस्तांतरणाच्या नावाखाली शुल्क सूट मिळविली आणि नंतर ती जमीन इतर दुसऱ्या कारणासाठी वापरली किंवा विकली तर हस्तांतरण शुल्काची रक्कम व्याजासह वसूल करण्यात येणार आहे. --००--(महसूल विभाग)नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांतील कंपन्या दरम्यानच्या जमीन हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ नवीकरणीय उर्जा प्रकल्पांसाठी मुख्य कंपनीद्वारे प्रथमतः जमीन खरेदी करताना देय मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यात येतो मात्र त्यानंतर स्थापन करण्यात येणाऱ्या ग्रुप कंपनी किंवा स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) कंपनीद्वारे या जमिनीच्या होणाऱ्या हस्तांतरणात द्यावे लागणारे मुद्रांक शुल्क पूर्ण माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना गती मिळावी आणि कंपन्यांवरील अतिरिक्त आर्थिक भार कमी करून प्रकल्प तातडीने सुरू करण्यास मदत मिळावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण-२०२५ ते २०३५-३६ यामध्ये लागू करण्याचाही निर्णय घेतला आहे.--००--(कृषि विभाग)कृषि संचालक, सहसंचालकांसह चार पदांच्या निर्मितीस मान्यताराज्य शासनाच्या कृषि विभागाच्या अखत्यारितीतल कृषि आयुक्तालयात एक संचालक, दोन सह संचालक आणि एक अपर संचालक अशा चार पदांच्या निर्मितीस राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.केंद्र सरकारने राज्यात कृषि अभियांत्रिकी संचालनालय स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अँग्रीस्टँक योजनेच्या अंमलबजावणीसाठीही अँग्रीस्टँक संचालनालय स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार कृषि अभियांत्रिकी, मालमत्ता व्यवस्थापन व अँग्रीस्टँक संचालनालय स्थापन करण्यात आले आहे. त्यासाठी कृषि संचालक, अपर संचालक, सहसंचालक (सांख्यिकी) आणि सहसंचालक(माहिती-तंत्रज्ञान) अशी चार पदे निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता देण्यात आली आहे. या नवीन पदांची वेतनश्रेणी एस-२५ पेक्षा अधिक असल्याने त्याबाबत मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव ठेवण्यात आला. त्यानुसार आज चार पदांना मान्यता देण्यात आली.--००-- (सहकार व पणन विभाग)किल्लारीच्या श्री निळकंठेश्वर साखर कारखान्याला १८ कोटींचे कर्ज, एनसीडीसीकडे प्रस्ताव पाठवणारलातूर जिल्ह्यातील किल्लारी (ता. औसा) येथील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून कर्ज घेण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. लातूर जिल्ह्यातील किल्लारी (ता. औसा) येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याने राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून भांडवली खर्च व खेळत्या भांडवलासाठी कर्ज मिळावे यासाठीचा प्रस्ताव साखर आयुक्त, पुणे यांना सादर केला होता. त्यानुसार या कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्याकडून कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली. कारखान्याचा १८ कोटी ९ हजार रुपयांच्या कर्ज मागणीचा प्रस्ताव राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे. कारखान्याच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून व हे पूर्व उदाहरण म्हणून गृहीत धरले जाणार नाही आणि फक्त एकवेळचे उदाहरण म्हणून गृहीत धरण्यात येईल या अटीवर मान्यता देण्यात आली आहे. --००--(कौशल्य विकास व उद्योजकता विभाग)खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापनेच्या नियमांमध्ये सुधारणाराज्यात कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठांची स्थापना करण्याच्या नियमांमध्ये बदल करण्यास व त्याअनुषंगाने मार्गदर्शन सूचना काढण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या मार्गदर्शन सूचना लागू करतानाच, या विद्यापीठांच्या कामकाजाची व कार्याचे विनियमनकरिता काढण्यात आलेला ०५ फेब्रुवारी, २०२१ चा शासन निर्णय रद्द होणार आहे. या निर्णयामुळे प्रत्येक खाजगी कौशल्य विद्यापीठासाठी स्वतंत्र अधिनियम करण्याऐवजी, राज्यात स्थापन होणा-या कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील खाजगी कौशल्य विद्यापीठांना एकच कायदा लागू होणार आहे. त्याला अनुसरून आता विद्यापीठ स्थापनेसाठीचा प्रस्ताव, आवश्यक जमीन, आवश्यक बांधकाम, दाननिधी आदींबाबतचे नियम पुढीलप्रमाणे राहतील. कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यास इच्छूक असलेले संबंधित संस्था - प्रायोजक मंडळ, "महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४" मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतुदींस अनुसरून विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सविस्तर प्रकल्प अहवालासह शासनाकडे सादर करेल. या प्रस्तावासोबत एक कोटी रुपयांचे शुल्क भरावे लागेल. त्यानंतर छाननी समितीच्या शिफारशीनंतर सक्षम प्रधिकारी यांच्या मान्यतेने इरादापत्र निर्गमित केल्यानंतर, एक वर्षाच्या आत प्रायोजक मंडळ सूचना, शिफारशी यांचा पूर्तता अहवाल शासनास सादर करेल. अपवादात्मक परिस्थितीत शासनास हा कालावधी वाढविता येईल. मात्र त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी पन्नास लाख रुपये याप्रमाणे (प्रस्तावित शुल्काच्या ५० टक्के) याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. अशी मुदतवाढ एका वर्षासाठी व जास्तीत जास्त २ वेळा देण्यात येईल. त्यानंतर प्रायोजक मंडळाचे इरादापत्र आपोआप रद्द होईल. विद्यापिठाची स्थापना झाल्यानंतर संबंधित अधिनियमात कोणत्याही प्रकारची दुरूस्ती/सुधारणा/बदल करावयाच्या प्रस्तावासाठी शुल्क पन्नास लाख रुपयांचे शुल्क भरावे लागेल.विद्यापीठाची स्थापना ग्रामीण क्षेत्रात २५ एकर, तहसील किंवा जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी १५, तर शहरी क्षेत्रात (मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे शहराचे महापालिका क्षेत्र वगळून) १० एकर जमीन आवश्यक. संबंधित संस्थेकडे किमान १५ हजार चौ.मी. बांधकाम असणारी स्वतंत्र इमारत असावी. बांधकाम क्षेत्र मालकीचे किंवा ३० वर्षाच्या भाडे करार तत्त्वावर उपलब्ध असलेल्या जागेवर केलेले असावे, जमिनीचे हस्तांतरण करता येणार नाही.मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे महानगरपालिका क्षेत्र वगळता इतर सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमध्ये स्थापन होणा-या खाजगी कौशल्य विद्यापीठांकडे १० एकर जमीन उपलब्ध असावी (उदा. एनएमआरडीए, पीएमआरडीए इ.). या जागेमध्ये प्रशासकीय प्रयोजनासाठी आणि विद्याविषयक कार्यक्रम आयोजन करण्यासाठी १५ हजार चौ.मी. क्षेत्रावर बांधकाम (१० एकर जमिनीसह) आवश्यक असेल. या विद्यापीठाला १० कोटींचा दाननिधी स्थापन करावा लागेल. मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे या शहरांच्या ठिकाणी विद्यापीठाकडे किमान पंधरा हजार चौ.मी.ची स्वतंत्र इमारत असावी.--००--(उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग)समाजकार्य अभ्यासक्रमांची स्वतंत्र विद्याशाखा, तर विनाअनुदानित नवीन अभ्यासक्रम सुरु करता येणारसध्याच्या पारंपरिक महाविद्यालयातून समाजकार्य विषयाची स्वतंत्र विद्याशाखा अथवा नवीन अभ्यासक्रम आणि समाजकार्य महाविद्यालयात कायम विनाअनुदानित तत्त्वावर नवीन अभ्यासक्रम अथवा अतिरिक्त तुकडी सुरु करण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे समाजकार्य विषयाच्या जागा पुढील शैक्षणिक वर्षापासून वाढतील. राज्यातील समाज कार्य महाविद्यालयाची संख्या वाढल्याने आणि त्याप्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध न झाल्याने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने नवीन महाविद्यालयांना मान्यता न देण्याचा आणि कार्यरत महाविद्यालयात वाढीव विद्यार्थी संख्या न देण्याचा निर्णय घेतला होता. याबाबत १० एप्रिल २००१ आणि २४ ऑगस्ट २००४ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आले होते. २९ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार समाजकार्य महाविद्यालयांचा विषय उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला. समाजकार्य महाविद्यालयांच्या सबंधित विविध विषयांचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीने समाजकार्य महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबतच्या धोरणात बदल करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार सन २०२७-२८ शैक्षणिक वर्षापासून सध्या कार्यरत असलेल्या पारंपरिक महाविद्यालयात समाजकार्य विषयाची स्वतंत्र विद्याशाखा आणि अस्तित्वात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयात कायम विनाअनुदानित तत्त्वावर अतिरिक्त तुकडी सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.समाजातील अनुसूचित जाती, जमाती, महिला, बालके, दिव्यांग आणि इतर वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशिक्षित समाजसेवकांची मोठी आवश्यकता असते. मात्र नवीन महाविद्यालयाला मान्यता न दिल्याने किंवा अस्तित्वातील महाविद्यालयात नवीन तुकडी सुरू करण्यास मंजुरी न दिल्याने अशा पदवीधारकांची कमतरता जाणवत होती. त्यामुळे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बहुविद्याशाखीय शिक्षणाचे महत्व विचारात घेता, सद्यस्थितीत कार्यरत महाविद्यालयात आणि पारंपरिक महाविद्यालयात नवीन शाखा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला होता.राज्यात सध्या ६९ मान्यताप्राप्त समाजकार्य महाविद्यालये आहेत. त्यापैकी एक बंद, १८ कायमस्वरूपी विनाअनुदानित, ४७ अनुदानित, एक अंशत अनुदान तत्त्वावर आणि दोन विद्याशाखा अनुदान तत्त्वावर कार्यरत आहेत. --००--(विधि व न्याय विभाग)हदगाव येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयनांदेड जिल्ह्यातील हदगाव येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय व सरकारी वकील कार्यालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हदगाव तालुक्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासाठी १९ नियमित व ६ पदे बाह्ययंत्रणेद्वारे अशा २५ पदांना तर सरकारी वकील कार्यालयासाठी ४ पदांना मान्यता देण्यात आली आहे. हदगाव ते नांदेड हे अंतर ६७ कि.मी. असून हदगाव तालुक्यातील काही गावे नांदेडपासून ८०-८५ कि.मी. अंतरावर आहेत. या निर्णयामुळे हदगाव तालुक्यातील पक्षकारांचा तसेच वकिलांचा वेळ व पैसा वाचणार आहे. नांदेड येथून ३४४ दिवाणी व ३२७ फौजदारी अशी एकूण ६७१ प्रलंबित प्रकरणे हदगाव येथील न्यायालयात हस्तांतरित होतील. नवीन न्यायालयाच्या स्थापनेसाठी येणाऱ्या १ कोटी ८३ लाख इतक्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ ऑगस्ट २०२६


## भीमराव पांचाळेंच्या गझल संवादाने रसिक मंत्रमुग्ध; गझल गायकीचा प्रवास उलगडला

गझलेसाठी आयुष्य वेचणारे जागतिक कीर्तीचे सुप्रसिद्ध गझल गायक,संगीतकार गझलनवाज भीमराव पांचाळे ह्यांचा गझल संवाद जीवन विकास ग्रंथालय ,छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला होता. भीमराव पांचाळे ह्यांचा गझल संवाद कार्यक्रम म्हणजे गझल पर्वणीच असते.गझल विषयाचे चिकित्सक विचार,निरीक्षणे,अनुभव आदरणीय भीमराव मनापासून सांगतात.हा संवाद माणसाला माणुसकीकडे नेणारा असतो.हा गझल संवाद ऐकणारा गझल तृप्त होतो.यादरम्यान गझलगायकीचा प्रवास भीमराव दादांनी रसिकांसमोर उलगडला.गझल कशी लिहावी,गझल कशी गावी याविषयीचे धडे त्यांनी गझल प्रेमींना दिले .गझल गायनात केलेले वेगवेगळे प्रयोग त्यांनी त्यांच्या जादुई गायकीतून सादर केले. ' ग ' गर्वाचा नसून ' ग ' गझलेच्या गौरवाचा आहे असे त्यांनी सांगितले.गझल सर्वदूर पोचावी यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावे लागतील असे प्रतिपादन दादांनी यावेळी केले.गझल ही साधना आहे,गझल हे पवित्र व्रत आहे ते प्रामाणिकपणे करावे ,असे मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी त्यांनी'अंदाज आरशाचा वाटे खरा असावा बहुतेक माणसाचा तो चेहरा असावा,"आयुष्य तेच आहे अन् हाच पेच आहे."दान द्यावे लागते,जीवनाला दान द्यावे लागते,"भलभलते सांगतेस का उगाच भांडतेस." तुझे अंदाज चुकण्याचा तुला अंदाज आला ना," उद्देश पावलांचा जाणे पुढेच जाणे "श्वास गझल निःश्वास गझलजगण्याचा विश्वास गझल"हे असे बागेवरी उपकार केलेकत्तली करूनी फुलांचे हार केले"गरिबाच्या लग्नाला मुलगी गोरी काय काळी काय!महागाईने पिचलेल्याना होळी काय दिवाळी काय! 'अशा अनेक दर्जेदार मराठी गझल सादर केल्या.त्याचप्रमाणे काही ऊर्दू गझलांचे शेर त्यांच्या खास शैलीत सादर करून रसिकांना दोन_ अडीच तास खिळवून ठेवले .दुसऱ्या सत्रात गझल रसिकांनी विचारलेल्या प्रश्नांची दिलखुलास उत्तरे भीमराव ह्यांनी दिली.हा गझल संवाद महाराष्ट्रभर व्हावा अशी इच्छा भीमराव पांचाळे ह्यांनी व्यक्त केली.गझलेचे गुरुकुल सुरू करण्याचा मानस भीमराव पांचाळे ह्यांनी बोलून दाखवला.ध्यास गझल साहित्य समूह,जीवन विकास ग्रंथालय,आकाशवाणी आणि न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस ह्यांच्या संयुक्त विद्यमाने हा गझल संवाद आयोजित केला होता.गझल सागर प्रतिष्ठान प्रस्तुत, ' गझल संवाद ' प्रयोगाचे अध्यक्षपद गझलनवाज भीमराव पांचाळे ह्यांनी भूषविले,प्रमुख अतिथी म्हणून श्री प्रफुल्ल कुलकर्णी (ज्येष्ठ गझलकार,पुणे) श्री सुजित बनसोडे (कार्यक्रम विभाग प्रमुख,तथा केंद्रप्रमुख,आकाशवाणी छ.संभाजीनगर) सौ.गीता ताई पांचाळे,श्री राजशेखर बालेकर कार्यवाह ,जीवन विकास ग्रंथालय) इत्यादी मान्यवर लाभले.यावेळी गझल क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या प्रफुल्ल कुलकर्णी ह्यांना ध्यास गझल गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले. कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलेले सुप्रसिद्ध गझलकार आत्माराम जाधव, डॉ.अविनाश कासंडे , अत्तम गेंदे,अजय त्रिभुवन,दिवाकर जोशी ह्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.गझल संवाद प्रयोगाचे बहारदार सूत्र संचालन गझलकार गिरीश जोशी ह्यांनी केले .या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड.कैलास कोळपकर,श्रीमती.मृणाल देशपांडे ,संध्या फुलपगार, अंजली दीक्षित, कस्तुरी कुलकर्णी, ॲड कल्याणी कोळपकर ,श्री राज दळेकर, श्री.गिरीश जोशी , डॉ.श्री राजशेखर बालेकर ह्यांनी कष्ट घेतले यावेळी शहरातील साहित्यिक,गझल गायक आणि गझल रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री माधवराव पाटील महाविद्यालयात उत्साहात पदवी प्रमाणपत्रांचे वाटप; ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर मान्यवरांचा भर



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित आणि नगर शिक्षण विकास मंडळ संचलित येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ‘पदवीप्रदान समारंभ’ मंगळवारी (ता. ११) रोजी उत्साहात पार पडला. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संस्थापक कै. माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष बापुराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास उमरगा जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष शरण पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. अंकुश कदम प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.यावेळी उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, उमरगा पंचायत समितीचे माजी सभापती मदन पाटील, जिल्हा परिषद सदस्य रफिक तांबोळी, योगेश राठोड, नगरसेवक गणेश अंबर, सूर्यकांत जाधव, डॉ. सतीश शेळके, प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे औचित्य साधून विशेष उपलब्धी प्राप्त केलेल्या मान्यवरांचा व प्राध्यापकांचा गौरव करण्यात आला.शरण पाटील यांची नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूमच्या सचिवपदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला.प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे यांचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.डॉ. नितीन हुलसुरे, डॉ. पंकज पाताळे यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.यानंतर महाविद्यालयातील बीए, बीकॉम, बीएस्सी, बीसीएस, एमए, एमएस्सी अभ्यासक्रमांच्या उत्तीर्ण विद्यार्थी-विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्रे गौरवासह प्रदान करण्यात आली. O चौकट : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यवसायभिमुख शिक्षण देण्याचा संस्थेचा मानस आहे. तंत्रज्ञानाच्या या युगात येथील तरुण स्वावलंबी आणि गुणवत्तापूर्ण बनला पाहिजे, यासाठी आमची निरंतर वाटचाल सुरू आहे.— शरण पाटील अध्यक्ष, उमरगा जनता सहकारी बँक तथा सचिव, नगर शिक्षण विकास मंडळO विद्यापीठाने २०१७ पासून महाविद्यालयांमध्येच पदवीदान समारंभ घेण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्तुत्य आहे. स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेकी वापर टाळावा, आपल्या अंगी विविध कौशल्ये आत्मसात करावीत आणि मिळवलेल्या पदवीचा समाजाच्या विकासासाठी उपयोग करावा.— प्रा. डॉ. अंकुश कदम व्यवस्थापन परिषद सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठकार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी केले. पदवीदान समारंभाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र गायकवाड आणि परीक्षा विभाग प्रमुख प्रा. डॉ. नरसिंग कदम यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार डॉ. राम बजगिरे यांनी मानले. या समारंभास महाविद्यालयातील विविध शाखांचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित पदवीदान समारंभ प्रसंगी विविध शाखेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना पदवी वितरण करताना मान्यवर व अन्य.